IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रीच्या कविता

**डॉ. पुरूषोत्तम गुणवंतराव पखाले**
मराठी विभाग प्रमुख
मा. अ. मु. समाजकार्य महाविद्यालय
नरखेड, जि. नागपूर.
८३९०३३७३२४
puroshotampakhale@gmail.com

साहित्याच्या क्षेत्रात अनेक प्रकारचे साहित्य वांड्मय आणि त्याचे संप्रदाय विविध स्वरूपाने लिहिल्या जात आहेत. साहित्यरचना ही साहित्याच्या प्रगल्भतेवर आणि त्याच्या उच्चारल्या जाणाऱ्या साहित्य लेखनातील प्रतिमेवर अवलंबून असते. कोणत्याही साहित्यातील जाणिवा साहित्यिकांमध्ये आणि सदर संप्रदायामध्ये उत्पन्न होणे अनिवार्य असते. कोणत्याही साहित्याचा उगम हा प्रांतवार रचनेवर आधारित असतो. प्रांतरचना कशी आहे तेथील भाषा, जातककथा, त्याठिकाणी बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा, यातील सौंदर्य अधिका–अधिक सविस्तरपणे विविध पैलू ने मांडण्याचे भाषासौंदर्य साहित्यिकांमध्ये असले, की, त्या त्या प्रांतातील ज्या साहित्य प्रकाराला हाताळण्यात येते तो साहित्यप्रकार त्या साहित्यिकाच्या जाणिवेवरती, लेखनाच्या कसबावरती ते वांड्मय कितपत यशस्वी होईल,त्याचे साहित्यविश्व कसे राहील ते ते ठरवीत असतात. तो साहित्य प्रकार किती लोकांच्या वाचनातून ऐकविण्यात आलेला आहे. किती लोकांनी त्याला वाचून वाहून नेण्याचे परिश्रम कसब त्या त्या साहित्यिकांनी दाखविले आहे. तसेच आंबेडकरवादी कवयित्री चे काव्य वांड्मय किती मोठ्य प्रमाणात प्रगल्भ आणि यशस्वी झालेत. यादृष्टीने तपासणे, त्याचे मूल्य ठरवणे. आणि ते कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहे त्याच्या अधिकाधिक यशस्वीतेच्या दिशा आणि जाणिवेचे वाचक वर्ग कसे आहेत हे तपासण्याचे निकष आणि सर्वसामान्य वाचकाला साहित्यिकाला ज्या वाङ्मयामध्ये ते रुचकर वाटतात, अभिरुची संपन्न वाटतात, तेच वाङ्मय हाताशी धरून काही आंबेडकरवादी कवयित्रींनी यशस्वीपणे कवितेचे लेखन संपादन करून आंबेडकरवादी कवयित्री हा वाङ्मय प्रकार नव्यानेच प्रगल्भतेच्या दिशेने जात असल्याचे दिसते.

आजपर्यंत भारतातील साहित्यविश्वात जे साहित्य उदयास आले ते साहित्य काही वर्गाच्या, काही लोकांच्या अभिरुचीसंपन्नतेवर निर्माण झाल्याचे दिसतात. साहित्याच्या सुरुवातीच्या काळात संत साहित्य, पंडित साहित्य, भटांचे साहित्य, शाहिरी वाङ्मय, नाटक, आत्मचरित्र–चरित्र, कादंबरी वाङ्मय, लोकसाहित्य, पोवाडा साहित्य, ललित निबंध लेखन, दलित वाङ्मय इ. अशा प्रकारचे अनेक साहित्य साहित्यविश्वात तयार झालेत. या साहित्य प्रकाराचा वाचक वर्ग ठरावीक होता जी वाङ्मय निर्मिती झाली तो वाङ्मय प्रकार जेवढ्या जास्त प्रमाणात वाचकांनी स्वीकारला ते एवढ्या मोठ्या प्रमाणात ते साहित्य निर्माण व्हायला लागलेत की, उदाहरणार्थ सुरूवातीला नाटक प्रकार हा शहरी भागाचा पुरताच मर्यादित होता. नंतरच्या कालावधीत त्यांचा प्रेक्षकवर्ग वाढला नाटकाचे रूपांतर दीर्घ–नाटकामध्ये झालेत. नंतरच्या काळात त्या नाटकातील लोकप्रिय भाग हा चित्रपटांमध्ये आकर्षकरित्या दाखविल्या गेलात. आणि चित्रपटाने जगभर आपली छाप निर्माण केली. या वाङ्मयाचे स्त्रोत सुरवातीचे संत वाङ्मयातून लोकसाहित्यातून आणि लोक वाङ्मयातून निर्माण होतात. सुरुवात ही वाङ्मय किती सकस असते. साहित्याची व्यापकता कशी असते. नंतर त्याचे व्यापक स्वरूप अनेक प्रकारच्या ज्वलंत कथांनी घेऊन चित्रपटामध्ये ते प्रदर्शित केले जातात.

असाच एक वाङ्मय प्रकार आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता त्या पुढीलप्रमाणे सविस्तर उदाहरणासह पाहता येईल.

''नागव्या बदनाम झोपड्या
बेडव्यांच्या मजबुतीला जळत आहे
काळया जर्जर तरटाच्या डोळयातून लष्कराची  फडफडणारी तोरनं
सरपटत येणाऱ्या जीवांचा
कसरतिचा खेळ बघत आहे''[१] (पृष्ठ क्र १)

प्राध्यापिका कवयित्री कुमुद पावडे यांच्या काव्यसंग्रह मध्ये पहिलीची कविता आहे ती या देशातल्या मागासवर्गीयांचे आणि ते ज्या परिस्थितीत जीवन जगत आहे त्या परिस्थितीला कारणीभूत असलेल्या व्यवस्थेने मागासलेल्या अतिगरीब लोकांच्या वस्त्या किती अन्यायग्रस्त आहे हिरोशिमा. नागासाकी पेक्षाही त्यांची वाईट अवस्था झाली आहे यामुळे सनातनी पाचवी बाम आंबेडकरवादी विचाराच्या लोकांवरती  अन्याय करत असल्याचे दिसते म्हणून आंबेडकरवादी कवितेच्या कवितेमधून मागवलेल्या संस्कृतीवर झालेला अन्याय तरटातून डोळयातून फडफडणारी दुःखे कासावीस करत असल्याचे दिसते.

बहिणी—बहिणी या कवितेत

फुलवू कड्यामधूनी फुलं
ज्योतीराव भीमराव आमच्यासाठी हो झिजले
खडक फोडूनी अमुच्यासाठी जलसिंचन केले प्राशुनी
जलसरी जीवन उजळीत
जोमाने वाढविले करूया सारे जतन या रे
बनु या अवघे भले''.[२] (पृष्ठ क्र ७)

आंबेडकरवादी विचारसरणीच्या अनेक कवयित्रीपैकी सुगंधा शिंदे ह्या ही एक आंबेडकरवादी विचार प्रवाहातून फुलून गेलेल्या आणि आपले विचार कवितेच्या माध्यमातून स्पष्ट करताना त्या म्हणतात फुलू कड्या मधूनी फुलं ज्या पद्धतीने फुले शाहू आंबेडकरांनी अन्याय सहन करून मागासलेल्या लोकांवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी स्वतःला अन्याय सहन केले त्याविरुद्ध त्यांनी संघर्ष केला आणि सर्व लोकांना समानतेचे हक्क प्राप्त करून दिलेत अशाप्रकारे सुगंधा शिंदे आपले परिवर्तनवादी कवितेच्या अनुषंगाने संघर्ष विद्रोह करताना दिसतात-

एकदमच तिला महाडच्या पेटत्या
पाण्याची अनिवार तहान लागली
पुणे कराराने तळमळून उठली
तिच्या मनात झटकन वीज लकाकली
कडकं डोहाळयाचे मर्म उमगले
ती हरखून गेली धुंदावून गेली
सूर्य नक्षी रुजत होती

डोहाळे तेजात भिजत होते''.३ (पृष्ठ क्र १२)

आंबेडकरवादी संघर्ष करणाऱ्या हिरा बनसोडे यांच्या कवितेमधून आपल्याला आक्रोश दिसून येतो- त्या डोहाळे नावाच्या कवितेत सांगतात एकदा वस्तीला महाडच्या पेटत्या पाण्याची आठवण झाली आणि तिच्या मनात वीज लकाकली, डोळ्यातले मर्म उमगले आणि ती त्या विचाराने धुंद होऊन अन्यायाविरुद्ध आक्रोश, डोहाळे आकांत करायला लागली, आमचे हक्क अधिकार कसे हिरावून घेतलेत- याविषयी कवित्रीने आपले विचार अन्यायग्रस्त व्यवस्थेपुढे तिने ठेवला आणि समानतेची वागणूक तिने मागण्याचा प्रयत्न केला-

तू कसा आला
किती वेळ वेडा
होणार अध्यात्माच्या गुंगीने कि फाटक्या परिस्थितीने
किती रस्ता चाललो पिढ्यान् पिढ्या
मैलाचा दगड मिळालाच नाही
स्वच्छ आरसा
ज्यात दिसेल समाजमनाची स्पष्ट प्रतिमा
दोस्तहो आपणच आपल्या बुद्धीचे मालक
हक्कदार तेव्हा विचार करा''४ ( पृष्ठ क्र २१)

काही आंबेडकरवादी कवयित्री यांच्या मनामध्ये समाजाविषयी चैनच पडत नाही त्यापैकी एक सुरेखा भगत आपल्या 'देणे' नावाच्या कवितेमध्ये म्हणतात की तू कसा आला किती वेळा वेडा होणार युगायुगाची अध्यात्माची गुंगे फाटक्या फाटक्या परिस्थितीने या व्यवस्थेला सनातन प्रवृत्तीनुसार परंपरावादी मैलाचे दगड इथेच पाहायला मिळतात. ज्या दिसते समाजमनाची स्पष्ट रचना म्हणून यातून आपले दुःख कसे विकोपास जाते ते सांगण्याचा प्रयत्न कवित्रीने केला आहे-

मंदिराचे रंग महाल करणारे धर्ममार्तंड
कालावंडाताना पहायचे होते मला
पण
मी पाहिली
माझ्या श्वासावर फुलणारी
तुझी बाग जळताना सुगंधाने
लोटच्या लोट
धडाका देत
रक्तबंबाळ झाले
तरीही नाही फुटला कोंब
आकाशाच्या कोवळ्या कांतीला
हा कुणाचा कुणाच्या स्वप्नांचा चुरा

विखरून पडलाय पृथ्वीवर''५( पृष्ठ क्र २३)

आंबेडकरवादी प्राध्यापक सिसिलिया कार्व्हालो या आपल्या बाग कवितेमध्ये सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी समाजव्यवस्था उतरंडी प्रमाणे निर्माण करून ठेवलेली आहs- त्यास प्रत्येक कप्प्यांमध्ये आपापल्या जातीचे धर्माचे महाल] मंदिरामध्ये धर्ममार्तंड कालवताना दिसतो- श्वासावर फुलणारी सुगंधाची बाग रक्ताच्या पोटामध्ये धडकk देत आहेत आणि हे आकाशाच्या गोळ्या कान तिला जेव्हा सहन होत नाही तेव्हा प्राध्यापक सिसिलिया कार्व्हालो यांच्या अनेक कविता मधून विद्रोह संघर्ष आणि अन्यायग्रस्त समाज रचना आपल्याला कवयित्रीने प्रत्येक कडव्यात ऊने शब्दातून ऊने आणि काळजातून दाखवण्याचा प्रयत्न करते.

वरील सर्व परिवर्तनवादी आंबेडकरी कवयित्री आपला समाजव्यवस्थेपुढे विद्रोह निर्माण करतात.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. युगाचे हुंदके, संपादक सुरेश साबळे (प्रा. कुमुद पावडे) संदेश प्रकाशन, प्रकाश नगर बुलढाणा–४४३००१
२. तत्रैव, ( सुगंधा शेंडे)
३. तत्रैव ( हिरा बनसोडे )
४. तत्रैव ( सुरेखा भगत)
५. तत्रैव ( प्रा. सिसिलीया कार्व्हालो )